महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १०१ वे | दिनांक : ०५/०४/२०२६ | वार : रविवार

## रात्र कोणासोबत घालवली ? एकनाथ खडसेंचा गिरीश महाजनांवर निशाणा



**जळगाव :** जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यातील जमीन खरेदी प्रकरणामुळे राज्याच्या राजकारणात नवे वादळ निर्माण झाले आहे. या प्रकरणी एकनाथ खडसे आणि त्यांच्या मुलीवर गुन्हा दाखल झाल्यानंतर खडसे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. बोधवड पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्यानंतर त्यांच्यावर राजीनाम्याचा दबाव टाकला जात असल्याची चर्चा सुरू आहे. मात्र, पूर्वी मी नैतिकतेच्या आधारावर राजीनामा दिला होता, पण आता तसं होणार नाही, असे ठामपणे सांगत त्यांनी माघार घेण्यास नकार दिला आहे.

या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना खडसे यांनी नाव न घेता जामनेरमधील एका बड्या मंत्र्यावर टीका केली. माझ्या राजीनाम्याची भाषा करणाऱ्यांनी आधी स्वतःच्या कारवायांचा विचार करावा, असा टोला त्यांनी लगावला. पुढे बोलताना त्यांनी अशोक खरात प्रकरणाचा संदर्भ देत अधिकच खळबळजनक विधान केले. जे खरातकडे गेले असतील, त्यांच्यासोबत रात्र घालवली असेल, त्यांना जाऊन विचारा, असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे काही नेत्यांवर गंभीर आरोपांचे संकेत दिले.

खडसे यांच्या या विधानांमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. त्यांनी कोणाचेही नाव घेतले नसले तरी त्यांच्या वक्तव्याचा रोख जामनेरकडे असल्याची चर्चा रंगली आहे. मी कोणाबद्दल बोलतोय हे तुम्ही समजून घ्या, असे म्हणत त्यांनी अप्रत्यक्षपणे गिरीश महाजन यांच्याकडे इशारा केल्याचे मानले जात आहे. या सूचक वक्तव्यामुळे दोन्ही नेत्यांमधील वाद पुन्हा उफाळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, जमीन खरेदी प्रकरणी दाखल झालेल्या गुन्ह्यामुळे खडसे यांच्यावर दबाव वाढल्याचे बोलले जात आहे. भुसावळ तालुक्यातील व्यवहारावरून हा गुन्हा दाखल झाला असून त्यानंतर राजकीय वातावरण तापले आहे. विरोधकांकडून खडसेंवर टीका होत असताना त्यांनी मात्र संघर्षाची भूमिका घेतली आहे. खोट्या गुन्ह्यांना मी घाबरणार नाही, असे ठामपणे सांगत त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

दुसरीकडे मंत्री गिरीश महाजन यांनी या प्रकरणावर पलटवार केला आहे. आम्ही कोणत्याही भोंदू बुवा-बाबाकडे जात नाही. अशा बाबकडे जाण्याची आम्हाला गरज नाही. कोणालाही हाथ दाखवून भविष्य पाहण्याची मला आवश्यकता नाही. माझा माझ्या कर्तृत्वावर विश्वास आहे. असे म्हणत महाजन यांनी खडसे हे बुवा-बाबाकडे जात असल्याचे म्हटले आहे. आमचे सरकार पडणार? असा दावा ते करत असतील तर त्यांना मंत्रीपदासाठी आमच्या शुभेच्छा, असे म्हणत महाजन यांनी खडसे यांना टोला लगावला आहे.

एकंदर पाहता, या प्रकरणामुळे जळगाव जिल्ह्यातील नाथाभाऊ विरुद्ध गिरीशभाऊ, हा वाद पुन्हा एकदा तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत. खडसे आणि महाजन यांच्या आक्रमक वक्तव्यामुळे राजकीय संघर्ष अधिकच वाढण्याची शक्यता आहे. येत्या काळात या प्रकरणावर कोणती राजकीय घडामोडी घडतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मोठे मन दाखवण्याची मागणी काँग्रेसने फेटाळली



**मुंबई :** बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या विरोधात उमेदवारी देण्याबाबत काँग्रेस पक्ष ठाम असल्याचे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी स्पष्ट केले आहे. या आधी पक्षाची जी भूमिका होती, त्याच भूमिकेवर काँग्रेस पक्ष ठाम असल्याचे देखील त्यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.

वास्तविक या संदर्भात भारतीय जनता पक्षाच्या वतीने तसेच अजित पवार यांच्या पक्षाच्या वतीने ही निवडणूक बिनविरोध करण्याची मागणी करण्यात आली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील ही निवडणूक बिनविरोध करण्याची मागणी केली होती. मात्र तरी देखील काँग्रेस पक्षाची भूमिका ठाम असल्याचे सपकाळ यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे सुनेत्रा पवार यांच्या विरोधात काँग्रेस उमेदवार देणार, हे जवळपास निश्चित मानले जात आहे.

बारामती विधानसभा पोटनिवडणूक संदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शशिकांत शिंदे यांना आमची भावना कळवली असल्याचे हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले. यासंदर्भात चर्चा जरी सुरू असली तरी पक्षाने दोन्ही ठिकाणी उमेदवारांची चाचपणी केलेली आहे. उद्यापर्यंत उमेदवाराच नाव काँग्रेस पक्षाच्या वतीने अंतिम करणार असल्याचं हर्षवर्धन सपकाळ सांगितले आहे. या पोटनिवडणूक संदर्भाची जी भूमिका होती त्या भूमिकेवर काँग्रेस पक्षात ठाम आहे. या संदर्भात राज्यस्तरावर तसेच राष्ट्रीय स्तरावर देखील सर्व नेत्यांशी चर्चा झाली असल्याचे सपकाळ यांनी सांगितलं. त्यामुळे या संदर्भात उद्या दुपारपर्यंत निर्णय घेतला जाईल, असे देखील ते म्हणाले.

या संदर्भात माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सर्वच पक्षांनी सुनेत्रा ताईंना पाठिंबा दिला पाहिजे. माझी अशी सर्वांना विनंती असेल की, ही पोटनिवडणूक बिनविरोध झाली तर महाराष्ट्राला साजेशी अशा पद्धतीने परिस्थिति होईल. यापूर्वी अनेक वेळा महाराष्ट्राने बिनविरोध पोटनिवडणूक केलेली आहे. मला आठवतं की, ज्या वेळेस आर. आर. आबांचे दुःखद निधन झालं होतं. त्यावेळी आपण पोटनिवडणूक बिनविरोध केली होती. भाजपने ठरवले होते की, निवडणूक लढणार नाही. त्यामुळे सर्वच पक्षांनी मन मोठे करून बिनविरोध निवडणूक करायला हवी, असे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## नांदेड गँगवॉरने हादरले, मध्यरात्री ३ जणांचा मर्डर




**नांदेड :** गत काही महिन्यांपासून वेगवेगळ्या गुन्हेगारी घटनांमुळे चर्चेत असणारे नांदेड शहर शुक्रवारी पुन्हा एकदा रक्तरंजित गँगवॉरने हादरले. ताज्या घटनेत ३ जणांची निर्घृण हत्या झाली असून, ३ जण गंभीर जखमी झालेत. दोन टोळ्यांतील जुन्या वैमनस्यातून ही घटना घडली. पण रस्त्यावर झालेला हा वाद नंतर थेट रुग्णालयापर्यंत पोहोचला आणि परिस्थिती आणखी चिघळली. या घटनेमुळे शहरात भीतीचे वातावरण पसरले आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, नांदेड शहरातील डी मार्ट परिसरात असलेल्या ई-स्वेअरलगत शुक्रवारी मध्यरात्री १ च्या सुमारास २ टोळ्यांत वाद झाला. त्यावेळी अरिजितसिंग चव्हाण हा धुरंधर-२ चित्रपट पाहून घराकडे जात होता. अरबाज व इतर काही हल्लेखोरांनी तलवार व खंजीरने त्याच्यावर सय्यद आवेज सय्यद खलील, घनश्याम रेड्डी, मोहम्मद अरबाज व इतर काही हल्लेखोरांनी तलवार व खंजीरने हल्ला केला. त्यात २५ वर्षीय अरिजितसिंग चव्हाण याचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी या घटनेत जखमी झालेल्या सय्यद आवेज, सय्यद खलील व इतर एकाला तत्काळ सरकारी रुग्णालयात दाखल केले.

तिकडे हल्लेखोरांना सरकारी दवाखान्यात दाखल केल्याची गोष्ट अरिजितसिंग चव्हाणच्या भावाला समजली. त्यानंतर त्याने तत्काळ रुग्णालयाच्या धाव घेतली. तिथे त्याने जखमी सय्यद आवेज सय्यद खलील (२७) व मोहम्मद अरबाज मोहम्मद फारुख (२३) या दोघांवर धारदार चाकूने हल्ला केला. त्यात या दोघांचाही मृत्यू झाला.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ एप्रिल २०२६


## आपण आपल्या मुलांना वारसा म्हणून काय देणार आहोत ? शुद्ध हवा की विषारी धूर ?



वाहने व कारखान्यांद्वारे होणारे वायू प्रदूषण आपण पाहतोच, पण आपल्या भोवताली घडणारे व सहजपणे दुर्लक्ष होणारे वायू प्रदूषण कचरा जाळण्यातुन होते. कचरा जाळणे ही सोय नाही, तर आपल्या आरोग्याशी केलेला जीवघेणा खेळ आहे. हे केवळ प्रदूषण नाही, तर 'विष' आहे!कचरा जाळल्याने कार्बन डायऑक्साइड, सल्फर डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साईड, डायऑक्झिन्स, फ्युरॉन्स यांसारखे अनेक घातक वायू आणि सूक्ष्म कण हवेत मिसळतात. विशेषतः प्लॅस्टिक आणि रबर जळाल्याने निघणारा धूर थेट कर्करोगाला आमंत्रण देतो. गंभीर परिणाम... आरोग्यश्वसनाचे विकार, दमा, हृदयविकार, त्वचेचे आजार, मेंदूचे विकार, कर्करोगाचा धोका इ.(अदृश्य शत्रू: धुरातील सूक्ष्म कण थेट फुफ्फुसांत शिरून रक्तप्रवाहात मिसळतात, जे रक्तातील ऑक्सिजन वहन क्षमता कमी करतात.) पर्यावरणसातत्याने होणारी तापमानवाढ (Global Warming) आणि निसर्गाचा ऱ्हास. आपली जबाबदारी.... काय करावे? कचरा जाळणे थांबवणे ही काळाची गरज आहे. खालील सोप्या गोष्टींचा अवलंब करावा:- कचऱ्याचे वर्गीकरण व खत निर्मिती :- कुजणाऱ्या कचऱ्यापासून खत तयार होते. पुरेशी जागा असल्यास कचरा कुजु द्या, अन्यथा घंटागाडीत टाकावा.- न कुजणारा कचरा (उदा. प्लास्टिक, पानकापड, पॉलिथिन) पुनर्प्रक्रियेसाठी घंटागाडीतच टाकावा.- पुनर्वापर (Recycle): टाकाऊ वस्तू, प्लास्टिक, कागद, काचेच्या बाटल्या भंगार व रद्दीत द्या.• वृक्षारोपण : हवा शुद्ध ठेवण्यासाठी जास्तीत जास्त झाडं लावून त्यांचे संगोपन करा. • तक्रार करा : परिसरात कचरा जाळला जात असल्यास स्थानिक प्रशासनाला (ग्राम पंचायत/ महानगरपालिका) त्वरित कळवा."हवा शुद्ध, तरच जीवन समृद्ध!"चला.. स्वच्छ व प्रदूषणमुक्त पर्यावरणासाठी आजच पाऊल उचलूया. कचरा जाळणे थांबवा, कचरा जाळण्यास विरोध करा.. 'श्वास' वाचवा!

**- संकलक**
**योगेश खोसरे**
**मो. ९४२३४५३६८४१**

## जालना येथील प्रा. लखन भुरेवाल यांचे पुस्तक केंद्रिय विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त



**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवने) :** इयत्ता दहावीच्या CBSE विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त असे “MASTERPIECE - Science for Class १०” हे मार्गदर्शक पुस्तक प्रा. लखन भुरेवाल (NET AIR ७८, SET) यांनी तयार केले असून हे पुस्तक बाजारात उपलब्ध झाले आहे. सध्या या पुस्तकासाठी Pre-Booking सुरू करण्यात आली आहे. पुस्तकाची किंमत फक्त ₹५९९/- ठेवण्यात आली आहे.हे पुस्तक CBSE च्या नवीन २०२६–२७ अभ्यासक्रमावर आधारित असून विद्यार्थ्यांना विज्ञान विषय सोप्या पद्धतीने समजावा आणि बोर्ड परीक्षेत उत्तम गुण मिळवता यावेत या उद्देशाने तयार करण्यात आले आहे.पुस्तकात NCERT मधील Intext व Exercise प्रश्नांची सविस्तर उत्तरे, सोप्या भाषेतील संकल्पनांचे स्पष्टीकरण, चित्रे, फ्लोचार्ट्स आणि प्रत्यक्ष जीवनातील उदाहरणे दिली आहेत. तसेच भौतिकशास्त्रातील संख्यात्मक प्रश्नांची स्टेप-बाय-स्टेप उत्तरे, रसायनशास्त्रातील महत्त्वपूर्ण अभिक्रिया आणि जीवशास्त्रातील संकल्पना अत्यंत सोप्या पद्धतीने स्पष्ट करण्यात आल्या आहेत.विद्यार्थ्यांच्या अधिक सरावासाठी Previous Year Questions, CBSE Sample Question Papers, अतिरिक्त सराव प्रश्न यांचा समावेश करण्यात आला आहे. याशिवाय पुस्तकाच्या शेवटी 5 पूर्ण अभ्यासक्रमावर आधारित सॅम्पल टेस्ट पेपर्स आणि त्यांची सविस्तर उत्तरे देण्यात आली आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना बोर्ड परीक्षेची तयारी अधिक प्रभावीपणे करता येईल.प्रा. लखन भुरेवाल हे अनेक वर्षांपासून विज्ञान विषयाचे मार्गदर्शन करत असून त्यांच्या अध्यापन पद्धतीमुळे मराठवाड्यातील अनेक विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन केले आहे.प्रा. लखन यांचा लवकरच जालन्यातील अहिर गवळी समाजातर्फे सत्कार करण्यात येणार असल्याचे भाजपचे मराठवाडा बुद्धिजीवी सेलचे प्रमुख श्री. तुलजेस चौधरी यांनी सांगितले.

## 'शिवराय का आठवावे?' : प्रा. डॉ. उमेश बगाडे यांनी उलगडले शिवरायांच्या स्वराज्याचे समाजशास्त्रीय पदर



**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ एका कालखंडाचे राजे नसून, ते एका प्रगत सामाजिक आणि आर्थिक विचारसरणीचे प्रवर्तक होते. त्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आयोजित 'शिवराय का आठवावे' या ऑनलाईन व्याख्यानातून ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. उमेश बगाडे यांनी महाराजांच्या धोरणांचे अत्यंत चिकित्सक आणि विविधांगी विश्लेषण केले. निमित्त होते, देवगिरी महाविद्यालय (छत्रपती संभाजीनगर), प्रतिष्ठान महाविद्यालय (पैठण), संत तुकाराम महाविद्यालय (कन्नड) यांच्या संयुक्त इतिहास विभाग आणि लोकसंवाद फाऊंडेशन (छत्रपती संभाजीनगर), यांच्या वतीने आयोजित 'शिवराय का आठवावे' या ऑनलाईन व्याख्यानाचे. ३ एप्रिल २०२६ रोजी संपन्न झालेल्या या कार्यक्रमात डॉ. उमेश बगाडे यांनी शिवरायांच्या धोरणांचे विविधांगी आणि समाजशास्त्रीय पैलू उलगडले.आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीत डॉ. उमेश बगाडे यांनी वारकरी संप्रदाय आणि शिवराय यांच्यातील सुसंगती अत्यंत नावीन्यपूर्ण पद्धतीने मांडली. ते म्हणाले की, "संतांनी जो समतेचा विचार आध्यात्मिक स्तरावर मांडला, त्याला शिवरायांनी स्वराज्याच्या रूपाने राजकीय आणि सामाजिक अधिष्ठान मिळवून दिले." अठरापगड जातींना एकत्र करून स्वराज्याची निर्मिती करणे, ही केवळ लष्करी गरज नव्हती तर तो एक यशस्वी सामाजिक समतेचा प्रयोग होता, असे त्यांनी नमूद केले. व्याख्यानाचा मुख्य भर महाराजांच्या शेतकरी आणि न्यायविषयक धोरणांवर होता. डॉ. उमेश बगाडे यांनी विश्लेषणात्मक मांडणी करताना सांगितले की, महाराजांनी तत्कालीन जाचक सरंजामशाही व्यवस्था मोडीत काढून रयतेचे थेट राज्य निर्माण केले. त्यांच्या प्रशासनाचा केंद्रबिंदू हा शेतकरी होता. 'रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका' हा त्यांचा आदेश केवळ लष्करी शिस्त नसून ती प्रजेप्रती असलेल्या संवेदनशीलतेची आणि सहिष्णूतेची सर्वोच्च पराकाष्ठा होती. किल्ल्यांच्या बांधकामात आणि त्यांच्या संरक्षणात महादेव कोळी समाजासह सर्वच कष्टकरी समाजाचे जे योगदान राहिले, त्याकडे डॉ. उमेश बगाडे यांनी विशेष लक्ष वेधले. आंग्रे घराण्याने उभारलेले प्रभावी नौदल हे भारताच्या सागरी सीमा सुरक्षित करणारे पहिले स्वावलंबी पाऊल होते. विशेषतः 'खरात प्रकरणा'चा ऐतिहासिक दाखला देत, महाराजांनी कर्मकांडांना झुगारून देऊन विवेकी आणि न्याय्य राज्याची निर्मिती कशी केली, यावर त्यांनी प्रकाश टाकला परकीय व्यापारावर अंकुश ठेवण्यासाठी मिठावर लावलेला कर असो वा दक्षिण दिग्विजयावेळी राजकीय लवचिकता दाखवून केलेली गोवळकोंडा भेट असो; शिवरायांचे प्रत्येक पाऊल हे स्वराज्याच्या दीर्घकालीन हितासाठी होते. त्यांचे महिलांविषयक धोरण हे आजही आधुनिक जगासाठी नैतिकतेचा मानदंड असल्याचे डॉ. बगाडे यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शरद गावंडे यांनी आपल्या भाषणात या व्याख्यानाच्या औचित्यावर भाष्य केले. शिवरायांचे विचार आजच्या पिढीपर्यंत वस्तुनिष्ठ आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून पोहोचवणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. या उपक्रमासाठी प्रो. प्राचार्य रवी पाटील आणि प्रो. प्राचार्य जी. एस. सोनकांबळे यांचे विशेष सहकार्य लाभले. प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ. गणेश मोहिते उपप्राचार्य देवगिरी महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर डॉ. चेतना सोनकांबळे डॉ.मुकेश भोगे डॉ. अमोल मस्के प्रस्ताविक डॉ. राजेश करपे यांनी केले तर आभार डॉ. सुवर्णा पाटील यांनी मानले सूत्रसंचालन डॉ. महेश रोटे यांनी केले कार्यक्रमाच्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. बाळासाहेब टेकाळे प्रा. राजाराम जेवे, डॉ सुभाष सूर्यवंशी, डॉ. उमेश नवल, डॉ. दिगंबर जाधव, प्रा. पायल सूर्यवंशी, प्रा. रेवनाथ मस्के यांनी सहकार्य केले तसेच तीनही महाविद्यालयातील प्राध्यापकांनी सहकार्य केले आणि उपस्थिती दर्शवली महाविद्यालयांचे प्राध्यापक, इतिहास संशोधक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**


## महाराष्ट्र योग शिक्षक संघाच्या जिल्हा अध्यक्षपदी चंद्रकांत देशमुख



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** महाराष्ट्र योगशिक्षक संघाच्या राज्य, विभाग व जिल्हा स्तरावरील पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या संस्थापक अध्यक्ष डॉ. मनोज निलपवार, श्री. प्रसाद कुलकर्णी, डॉ.कृणाल महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये दिनांक ३१ मार्च २०२६ रोजी जाहीर करण्यात आल्या. यामध्ये परभणी जिल्हा अध्यक्षपदी श्री. चंद्रकांत देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली आहे. परभणी जिल्ह्यात योग शिक्षकांच्या विविध समस्यां करिता श्री. देशमुख यांनी वेळोवेळी परिश्रम घेतलेले आहेत. या कार्याची दखल घेऊन ही नियुक्ती केल्याचे त्यांच्या नियुक्ती पत्रात नमूद करण्यात आले आहे. श्री. सुभाष जावळे,श्री. गजानन चौधरी, श्री. वसंत पारवे व जिल्ह्यातील योग शिक्षक यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ एप्रिल २०२६


## ऊसाचा रस

सायंकाळच्या वेळी
रसवंतीवर जाऊ
एक ग्लास भरून
ऊसाचा रस पिऊ

ऊसाचा रस
किती गोडच गोड
त्यावर पिळायची
लिंबाची फोड

जाहिरातीचा नसतो
कधी गाजावाजा
मिटक्या मारीत प्यायचा
अगदी थंड ताजा

माणूसकीने जपू आपण
स्वदेशी मालाला
बाय बाय करू
विदेशी कोल्ड्रिंगला

स्वदेशीचा नारा
असूद्या सदा मुखी
शेतकरीराजाला
होवू द्या सुखी



**- रवींद्र चालीकवार**
**मु.पो.ता.महागाव**
**जि.यवतमाळ**
**मो.९०११५५९१०६**

## राबतांना बाप

बाप चालतो रे
संकटांची वाट
तेव्हा कुठे येते
तुझ्या पुढे ताट

अवघड घाट
बाप चढतोय
संकटांशी नित्य
बाप लढतोय

बापाचे हे कष्ट
जाऊ नये वाया
सांगतो तुला मी
रोज पड पाया

राबतांना बाप
घामाघुम होतो
तुला पाहताच
गाणे गोड गातो

बाप चालतो रे
सत्याचीच वाट
दुनियेत आली
लबाडीची लाट



**- नागेश बोंतेवाड**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.नं.९७६३२८३७०४**

## अब्दीमंडी येथे ट्रक दुचाकी अपघात दोन जखमी




**दौलताबाद (जावेद अहमद)** : संभाजीनगर-खुलताबाद महामार्गावर अब्दीमंडी गावाजवळ शनिवारी (दि. ४ एप्रिल) सकाळी आठ वाजेच्या सुमारास ट्रकने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने ऋतिक विलास सुडा (वय १६) आणि राहुल प्रेमचंद राठोड (वय १६, रा. रामपुरी तांडा, ता. जि. छत्रपती संभाजीनगर) हे दोघे जखमी झाले.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार ऋतिक व राहुल हे दोन्ही बजाज डिस्कवर क्रमांक एम.एच २० सी.एफ १०२८ वरून रामपुरी तांडा येथून छत्रपती संभाजी नगर कडे जात असताना छत्रपती संभाजी नगर येथून दौलताबाद कडे जाणारी ट्रक क्रमांक एम.एच १८ बी.झेड ५७५५ यांची अब्दिमंडी गावाजवळ धडक होऊन झालेला अपघातात दोन्ही जखमी झाले जखमींना ग्रामस्थांच्या मदतीने जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य संस्थांच्या रुग्ण वाहिकेत टाकून छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय घाटी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.(ही बातमी घेणे नंबर बरोबर आहे)


**प्रतिनिधी नेमणे आहे**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.


## जिंतूर तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना विविध मागण्यांचे निवेदन




**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : राज्यभरात पत्रकारावर होत असलेले विविध हल्ले, पत्रकारावर खोटे गुन्हे दाखल करणे यासह पत्रकारांच्या विविध मागण्यासाठी राज्यस्तरावर आंदोलन करण्यात येत असून शासनाने याची दखल न घेतल्यास राज्यभरामध्ये पत्रकार रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही असा इशारा व्हॉइस ऑफ मीडिया चे राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया यांनी दिलापत्रकारांच्या विविध मागण्याच्या संदर्भात दि 2 एप्रिल गुरुवार रोजी तहसील ऑफिस जिंतूर येथे आयोजित करण्यात आलेल्या धरणे आंदोलनात ते बोलत होते. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारावर ठीक ठिकाणी हल्ले होत आहेत. शिवाय खोटे गुन्हे दाखल करण्यात येत आहेत .पत्रकार हल्ला विरोधी कायद्याची अंमलबजावणी कठोरपणे करण्यात येत नाही. याशिवाय राज्यस्तरावरील विविध मागण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना चोरडिया म्हणाले की राज्य शासन लहान वर्तमानपत्राची गळचेपी करत असून त्यांना मिळणाऱ्या जाहिरातीची संख्या अत्यंत अपुरी आहे. शिवाय जाहिरातीचा दर अत्यंत कमी असून इतर दैनिकांच्या तुलनेने त्यांना मिळत असलेल्या जाहिराती या आकाराने छोटे आहेत . लहान वर्तमानपत्रांना जिल्हा स्तरावर देण्यात येणाऱ्या जाहिरातीच्या बाबतीत सुद्धा भेदभाव करण्यात येत आहे. या व पत्रकारांना देण्यात येणाऱ्या अधिस्वीकृती कार्ड हे ग्रामीण पत्रकारांना देण्यात यावे. त्या संदर्भात असलेल्या अटी शिथिल करण्यात याव्या. पत्रकारांना मिळणाऱ्या पेन्शनच्या संदर्भामध्ये जाचक अटी शासनाने रद्द करावे. या व इतर मागण्यांसाठी राज्यभर तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावर हे आंदोलन सुरू करण्यात आले आहे. शासनाने या आंदोलनाची वेळीच दखल घेणे अत्यंत गरजेचे असून शासनाने आंदोलनाची दखल न घेतल्यास राज्यभर या प्रश्नावर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा व्हॉइस ऑफ मीडिया चे राज्य कार्याध्यक्ष विजय चोरडिया यांनी दिला.जिंतूर येथे तहसील कार्यालयावर धरणे आंदोलन करण्यात आले. नायब तहसीलदार प्रशांत राखे यांना पत्रकारांच्या विविध मागण्याची निवेदन देण्यात आले . या मागण्या शासन स्तरावर पाठवण्याची विनंती त्यांना करण्यात आली यावेळी व्हॉइस ऑफ मीडियाचे मराठवाडा मार्गदर्शक राजाभाऊ नगरकर, तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण, व्हाईस ऑफ मीडियाचे जिल्हा उपाध्यक्ष मंचकराव देशमुख , सचिन रायपत्रीवार, गुलाबराव शिंदे, आनंद मूरक्या, नागनाथ दाभाडे, अरविंद तरटे, संदीप माहूरकर, शंकर देशमुख, (देशमुख), रामकिसन ठोंबरे, काशिनाथ घुगे, अशोकराव उकंडे, चंद्रकांत गवळी, विनोद पाचपिल्ले, देवकर दिलीप, आबासाहेब जाधव, राम रेघाटे, तायडे एस. एस., प्रभाकर कुऱ्हे, रंगनाथ गडदे, किशन खाडे, यादव मस्के, पंकज चव्हाण, राजू गारकर, , रामा ढाकरगे, पद्माकर कौसडीकर, तुकाराम सर्जे, नेमिनाथ जैन, मुंजा कंठाळे, संतोष लहाने आदींची उपस्थिती होती

## अय्युब पठाण यांना संत नामदेव उत्कृष्ठ साहित्य पुरस्कार प्रदान



**छत्रपती संभाजीनगर (अय्युब पठाण)** : हिंगोली येथील समृध्दी संस्थेच्यावतीने कवी तथा लेखक अय्युब पठाण लोहगावकर यांना नुकतेच त्यांच्या उत्कृष्ठ साहित्य लेखनाविषयी संत नामदेव साहित्य पुरस्कार समृध्दी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. श्रीराम कऱ्हाळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. अय्युब पठाण यांनी मराठी साहित्य क्षेत्रात गेल्या चाळीस वर्षापासून दर्जेदार साहित्य लेखन केलेले असून त्यांची आज पर्यत अकरा कवितासंग्रह आणि पाच कथासंग्रह असे सोळा पुस्तके प्रकाशित झालेले आहे. या शिवाय बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या इंग्रजी व हिन्दी माध्यमाला " पाणपोई " या कवितेचा अभ्यासक्रमात समावेश आहे. या मराठी साहित्य लेखनाचे योगदान याची योग्य दखल घेऊन अ. म. पठाण यांना सन्मानाचा संत नामदेव साहित्य पुरस्कार सन्मानपूर्वक हिंगोली येथे प्रदान करण्यात आले आहे. या पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, आणि सन्मानपत्र, शाल श्रीफळ, पुष्पहार असे आहे. यावेळी व्यासपीठावर समृध्दी संस्थेचे संचालक प्रा. डॉ. बाबुराव खंदारे, प्रा. डॉ. नवीन सोळंके हे उपस्थित होते.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ०५ एप्रिल २०२६

# गुणवत्तेच्या नावाखाली संधींचे केंद्रीकरण आणि वाढती शैक्षणिक विषमता - डॉ. राजेंद्र बगाटे

महाराष्ट्रातील उच्च शिक्षण व्यवस्था, सामाजिक न्यायाची परंपरा आणि सर्वसमावेशक विकासाचा विचार करता, दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेला शासन आदेश हा केवळ एक प्रशासकीय निर्णय नसून, तो राज्याच्या शैक्षणिक व सामाजिक संरचनेवर दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो. या शासन आदेशामध्ये शिक्षक किंवा प्राध्यापक भरती किंवा शैक्षणिक पात्रतेचे मूल्यांकन करताना उमेदवाराने शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाच्या किंवा संस्थेच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) क्रमांकाचा विचार करण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, परदेशी विद्यापीठांच्या बाबतीत QS, THE आणि ARWU (Shanghai) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना पहिल्या गटामध्ये ठेवण्याचा किंवा प्राधान्य देण्याचा निकष लागू करण्यात आलेला आहे. वरकरणी पाहता हा निर्णय गुणवत्ता आणि आंतरराष्ट्रीय दर्जा वाढविण्याच्या हेतूने घेतलेला वाटतो; मात्र वास्तवात तो सामाजिक विषमता वाढविणारा आणि वंचित घटकांना दुय्यम स्थान देणारा असल्याचे दिसून येते.महाराष्ट्रातील शैक्षणिक वास्तवाचा विचार केला असता, NIRF १०० च्या आत सातत्याने स्थान मिळवणारी सार्वजनिक विद्यापीठे म्हणजे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ ही प्रामुख्याने पुढे येतात. याचा सरळ अर्थ असा होतो की राज्यातील लाखो विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व्याख्या केवळ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ या दोन विद्यापीठांपुरती मर्यादित केली जाते. परंतु हा दृष्टिकोन वास्तवापासून पूर्णतः दूर आहे. कारण महाराष्ट्रातील बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण, आदिवासी, दलित आणि बहुजन समाजातून येतात, ज्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत मर्यादित असते. अशा विद्यार्थ्यांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठ सारख्या विद्यापीठांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे केवळ प्रवेश मिळवण्यापुरते मर्यादित नसून, ते आर्थिक, सामाजिक आणि मानसिक संघर्षांचे एक मोठे आव्हान असते.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती पाहिली असता, त्यांना दरमहा होणारा खर्च परवडणेही कठीण असते. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये राहण्यासाठी लागणारे भाडे, अन्न, प्रवास, शिक्षण शुल्क, पुस्तके आणि इतर आवश्यक खर्च यांचा एकत्रित विचार करता, हा खर्च हजारो रुपयांपर्यंत पोहोचतो. अशा परिस्थितीत गरीब, आदिवासी किंवा बहुजन कुटुंबातील विद्यार्थ्यांनी या शहरांमध्ये जाऊन शिक्षण घेणे हे जवळजवळ अशक्य ठरते. त्यामुळे शासन आदेशामध्ये नमूद केलेला निकष प्रत्यक्षात या विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या मुख्य प्रवाहातून बाहेर ढकलतो.या शासन आदेशाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे परदेशी विद्यापीठांच्या संदर्भातील निकष. QS, THE आणि ARWU (Shanghai) या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे ही गोष्ट केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम विद्यार्थ्यांसाठीच शक्य आहे. परदेशात शिक्षण घेण्यासाठी लागणारा खर्च हा लाखो रुपयांमध्ये असतो. यामध्ये केवळ शिक्षण शुल्कच नव्हे, तर राहणीमानाचा खर्च, प्रवास, व्हिसा, विमा आणि इतर अनेक खर्चांचा समावेश असतो. त्यामुळे गरीब किंवा सर्वसामान्य विद्यार्थ्यांसाठी हा पर्याय व्यवहार्य नाही. अशा परिस्थितीत शासनाने हा निकष लावणे म्हणजे सामाजिक विषमता अधिकच वाढविण्याचा मार्ग मोकळा करणे होय.याचबरोबर, या शासन आदेशातील सर्वात मोठी विसंगती म्हणजे त्याचा कालबाह्य वापर. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) ही प्रणाली भारतात २०१६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे २०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाच्या काळात या क्रमवारीचा कोणताही संबंध नव्हता. अशा विद्यार्थ्यांवर हा निकष लागू करणे म्हणजे त्यांच्या संधींवर अन्याय करणे होय. हा प्रकार न्याय आणि समानतेच्या मूलभूत तत्त्वांना विरोध करणारा आहे. कोणताही नियम तो लागू होण्यापूर्वीच्या कालावधीवर लावणे हे प्रशासनिक दृष्ट्या चुकीचे मानले जाते, आणि येथेही तीच चूक स्पष्टपणे दिसून येते.या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांचे अवमूल्यन होण्याची प्रक्रिया सुरू होते. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील अनेक विद्यापीठे ही लाखो विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची प्रमुख साधने आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून पुढे येतात आणि अनेकदा उत्कृष्ट यश संपादन करतात. मात्र त्यांच्या विद्यापीठाचा NIRF क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना कमी गुण दिले जातात. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य सन्मान होत नाही आणि त्यांच्या संधी मर्यादित होतात.यामुळे एक गंभीर सामाजिक परिणाम निर्माण होऊन विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. "आपण ज्या विद्यापीठात शिकलो ते कमी दर्जाचे आहे" ही भावना त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. शिक्षण ही आत्मविश्वास वाढविण्याची प्रक्रिया असताना, हा शासन आदेश उलट त्या प्रक्रियेला बाधा आणतो. विशेषतः ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी हा परिणाम अधिक तीव्र असतो.याचबरोबर, या निर्णयामुळे शिक्षण व्यवस्थेमध्ये वर्गभेद निर्माण होण्याची शक्यता वाढते. एकीकडे उच्च क्रमांकाच्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सधन वर्ग, तर दुसरीकडे स्थानिक विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारा सर्वसामान्य वर्ग अशी विभागणी निर्माण होते. ही विभागणी केवळ शैक्षणिक नसून सामाजिक आणि मानसिक स्वरूपाचीही आहे. यामुळे समाजात दरी वाढते आणि समतेचा पाया कमकुवत होतो.या सर्व पार्श्वभूमीवर, हा शासन आदेश केवळ एक शैक्षणिक धोरण नसून सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना आव्हान देणारा निर्णय ठरतो. त्यामुळे याचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता आणि समता यांचा समतोल राखणे ही शासनाची जबाबदारी आहे. परंतु सध्याचा निर्णय हा समतेपेक्षा असमतोल वाढविणारा ठरत असल्याचे स्पष्ट दिसते.शिक्षण, समानता आणि संविधानिक मूल्यांवरील परिणाम :-दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या शासन आदेशाच्या परिणामांचा विचार केवळ विद्यार्थ्यांच्या शिक्षणापुरता मर्यादित ठेवून चालणार नाही; कारण या निर्णयाचा सर्वात थेट आणि दीर्घकालीन परिणाम शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेवर, शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेवर आणि समाजातील समतेच्या संकल्पनेवर होणार आहे. या आदेशानुसार उमेदवारांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे मूल्यांकन करताना त्यांच्या शिक्षण घेतलेल्या विद्यापीठाच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) क्रमांकाचा आधार घेतला जात असल्यामुळे, शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेतच असमानतेची बीजे पेरली जात आहेत.शिक्षक किंवा प्राध्यापक हा केवळ ज्ञान देणारा घटक नसून तो समाज घडविण्याचा केंद्रबिंदू असतो. विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीतून आलेले शिक्षक किंवा प्राध्यापक विद्यार्थ्यांना व्यापक दृष्टिकोन देतात. परंतु जर शिक्षक भरती प्रक्रियेमध्येच काही विशिष्ट विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना अधिक प्राधान्य दिले गेले, तर या प्रक्रियेतून येणारी विविधता कमी होईल. परिणामी, शिक्षण क्षेत्रात एकसुरीपणा निर्माण होईल आणि विद्यार्थ्यांना विविध सामाजिक वास्तवांचा अनुभव घेण्याची संधी कमी मिळेल.या शासन आदेशामुळे ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील उमेदवारांना शिक्षक किंवा प्राध्यापक होण्याची संधी कमी मिळण्याची शक्यता आहे. कारण बहुसंख्य असे उमेदवार हे राज्यातील स्थानिक विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेले असतात. त्यांच्या विद्यापीठांचा NIRF क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना गुणांकनात कमी स्थान दिले जाईल. यामुळे त्यांच्या गुणवत्तेचा योग्य विचार न होता केवळ संस्थेच्या क्रमांकावरून त्यांचे मूल्यमापन केले जाईल. हा प्रकार केवळ अन्यायकारकच नाही, तर शिक्षणाच्या मूलभूत तत्त्वांनाही विरोध करणारा आहे.संविधानाच्या दृष्टीने पाहिले असता, भारतातील प्रत्येक नागरिकाला समान संधी मिळण्याचा अधिकार आहे. सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या घटकांना पुढे आणण्यासाठी अनेक विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. परंतु या शासन आदेशामुळे या घटकांना प्रत्यक्षात स्पर्धेबाहेर ढकलले जात आहे. शिक्षण हे सामाजिक उन्नतीचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते; परंतु जर शिक्षणाच्या संधीच मर्यादित केल्या गेल्या, तर सामाजिक न्यायाची संकल्पना केवळ कागदावरच उरेल.या निर्णयामुळे राज्यातील इतर विद्यापीठांच्या प्रतिमेवरही विपरीत परिणाम होतो. मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणातील विद्यापीठे ही केवळ शिक्षण संस्था नसून त्या त्या भागातील सामाजिक आणि आर्थिक विकासाची केंद्रे आहेत. या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणारे विद्यार्थी अनेक अडचणींवर मात करून पुढे येतात. परंतु त्यांच्या विद्यापीठांचा क्रमांक कमी असल्यामुळे त्यांना कमी लेखले जाते. यामुळे या विद्यापीठांची प्रतिष्ठा कमी होते आणि त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलतो.याचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे गुणवत्तावान विद्यार्थी आणि शिक्षक किंवा प्राध्यापक हे मोठ्या शहरांकडे स्थलांतर करतात. परिणामी, स्थानिक विद्यापीठे कमकुवत होतात. त्यांच्याकडे संसाधनांची कमतरता निर्माण होते आणि त्यांच्या विकासावर परिणाम होतो. ही प्रक्रिया पुढे जाऊन शिक्षणातील प्रादेशिक विषमता अधिक वाढवते. एकीकडे पुणे आणि मुंबईसारखी पिद्यापीठे, शहरे अधिक मजबूत होतात, तर दुसरीकडे इतर भाग मागे पडतात.या धोरणाचा मानसिक परिणामही अत्यंत गंभीर आहे. विद्यार्थ्यांच्या मनात त्यांच्या शिक्षण संस्थेबद्दल न्यूनगंड निर्माण होतो. "आपण ज्या विद्यापीठात शिकलो ते कमी दर्जाचे आहे" ही भावना त्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. शिक्षण ही आत्मविश्वास वाढवणारी प्रक्रिया असताना, हा शासन आदेश उलट त्या प्रक्रियेला बाधा आणतो. विशेषतः आदिवासी, दलित आणि बहुजन विद्यार्थ्यांसाठी हा परिणाम अधिक तीव्र असतो, कारण ते आधीच सामाजिक आणि आर्थिक अडचणींना सामोरे जात असतात.याचबरोबर, या निर्णयामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये "गुणवत्ता" या संकल्पनेचा चुकीचा अर्थ लावला जातो. गुणवत्ता म्हणजे केवळ संस्थेचा क्रमांक नव्हे, तर विद्यार्थ्यांची मेहनत, त्यांचे कौशल्य, त्यांची विचारशक्ती आणि त्यांच्या अध्यापन क्षमतेचा एकत्रित परिणाम असतो. परंतु सध्याच्या धोरणामुळे गुणवत्ता ही केवळ क्रमांकापुरती मर्यादित केली जात आहे. हा दृष्टिकोन शिक्षणाच्या मूळ उद्दिष्टांनाच विरोध करणारा आहे.२०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात ही समस्या अधिक गंभीर होते. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) ही प्रणाली त्या काळात अस्तित्वातच नव्हती. त्यामुळे त्या काळातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या शिक्षणासाठी कोणतेही निर्णय घेताना या क्रमवारीचा विचार केलेला नव्हता. अशा विद्यार्थ्यांवर हा निकष लावणे म्हणजे त्यांच्यावर अन्याय करणे होय. हा निर्णय केवळ तांत्रिकदृष्ट्या चुकीचा नाही, तर नैतिकदृष्ट्याही अयोग्य आहे.या सर्व बाबींचा विचार करता, हा शासन आदेश शिक्षणातील विषमता वाढविणारा, सामाजिक न्यायाच्या तत्त्वांना बाधा आणणारा आणि राज्यातील इतर विद्यापीठांचे अवमूल्यन करणारा ठरतो. त्यामुळे याचा पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रात कोणतेही धोरण राबविताना त्याचा सर्व घटकांवर होणारा परिणाम विचारात घेणे गरजेचे आहे.पर्याय, उपाय आणि समतोल शिक्षणव्यवस्थेची गरज :-दि. ११ फेब्रुवारी २०२६ रोजी जाहीर झालेल्या शासन आदेशामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विचार करता, केवळ टीका करून थांबणे पुरेसे नाही; तर त्यासाठी योग्य पर्याय आणि रचनात्मक उपाय सुचवणे ही काळाची गरज आहे. शिक्षण क्षेत्र हे केवळ ज्ञान देण्याचे माध्यम नसून ते सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे. त्यामुळे या क्षेत्रात घेतलेले कोणतेही धोरणात्मक निर्णय हे सर्वसमावेशक, न्याय्य आणि वास्तववादी असणे आवश्यक आहे. परंतु सध्याच्या शासन आदेशामध्ये गुणवत्ता या संकल्पनेचा जो अरुंद अर्थ लावण्यात आला आहे, तो बदलणे अत्यंत गरजेचे आहे.सर्वप्रथम, उमेदवारांच्या गुणवत्तेचे मूल्यांकन करताना त्यांच्या शिक्षण संस्थेच्या राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) क्रमांकावर आधारित निकष लावण्याऐवजी त्यांच्या वैयक्तिक क्षमतेवर आधारित मूल्यांकन प्रणाली विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे ज्ञान, संशोधन क्षमता आणि सामाजिक बांधिलकी या घटकांचा विचार करून त्यांचे मूल्यमापन केले पाहिजे. केवळ संस्थेच्या क्रमांकावर आधारित मूल्यांकन केल्यास अनेक गुणवत्तावान उमेदवार संधीपासून वंचित राहतात.दुसरे महत्त्वाचे पाऊल म्हणजे राज्यातील सर्व विद्यापीठांना समान संधी उपलब्ध करून देणे. महाराष्ट्रातील प्रत्येक विद्यापीठ हे त्या त्या भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे प्रमुख केंद्र आहे. त्यामुळे त्यांना आवश्यक निधी, संशोधन सुविधा, पायाभूत सुविधा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षक किंवा प्राध्यापक उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. जर सर्व विद्यापीठांची गुणवत्ता सुधारली, तर विद्यार्थ्यांना केवळ काही मोजक्या विद्यापीठांवर अवलंबून राहण्याची गरज भासणार नाही.तिसरे म्हणजे, ग्रामीण आणि वंचित पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी विशेष सुविधा आणि सवलती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. पुणे किंवा मुंबईसारख्या शहरांमध्ये शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत, वसतिगृह सुविधा, शिष्यवृत्ती आणि मार्गदर्शन केंद्रे उपलब्ध करून दिली गेली, तर काही प्रमाणात विषमता कमी होऊ शकते. परंतु दीर्घकालीन उपाय म्हणून शिक्षणाचे विकेंद्रीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे.परदेशी विद्यापीठांच्या संदर्भातही शासनाने वास्तववादी दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. QS, THE आणि ARWU सारख्या जागतिक क्रमवारीत ५०० च्या आत असलेल्या विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणे हे सर्वांसाठी शक्य नाही. त्यामुळे या निकषाचा वापर केवळ अतिरिक्त गुणवत्तेचा घटक म्हणून करावा, तो अनिवार्य निकष म्हणून लावू नये. अन्यथा हा निकष केवळ सधन वर्गासाठीच फायदेशीर ठरेल.२०१६ पूर्वी पदवी प्राप्त केलेल्या उमेदवारांसाठी स्वतंत्र धोरण तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. राष्ट्रीय संस्थात्मक क्रमवारी चौकट (NIRF) ही प्रणाली त्या काळात अस्तित्वात नव्हती, त्यामुळे त्या काळातील विद्यार्थ्यांवर हा निकष लावणे अन्यायकारक आहे. अशा उमेदवारांसाठी त्यांच्या अनुभव, कार्यक्षमता आणि इतर गुणांवर आधारित मूल्यांकन प्रणाली तयार केली पाहिजे.याचबरोबर, शिक्षण क्षेत्रात "गुणवत्ता" या संकल्पनेचा व्यापक अर्थ स्वीकारणे गरजेचे आहे. गुणवत्ता म्हणजे केवळ उच्च क्रमांकाच्या संस्थेत शिक्षण घेणे नव्हे, तर त्या शिक्षणाचा समाजावर होणारा परिणाम महत्त्वाचा असतो. अनेकदा ग्रामीण भागातील विद्यापीठांमधून शिक्षण घेतलेले विद्यार्थी समाजात अधिक प्रभावी कामगिरी करतात. त्यामुळे त्यांच्या योगदानाचा योग्य सन्मान करणे आवश्यक आहे.शासनाने या निर्णयाचा पुनर्विचार करताना सामाजिक न्याय, समान संधी आणि सर्वसमावेशक विकास या तत्त्वांचा विचार करणे आवश्यक आहे. शिक्षण क्षेत्रातील कोणतेही धोरण हे केवळ काही मोजक्या लोकांसाठी नव्हे, तर सर्व घटकांसाठी फायदेशीर असावे. अन्यथा अशा धोरणांमुळे समाजात असंतोष निर्माण होण्याची शक्यता असते.या संदर्भात, शिक्षक किंवा प्राध्यापक भरती प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणि न्याय्यता सुनिश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. उमेदवारांची निवड करताना त्यांच्या वास्तविक गुणवत्तेचा विचार केला गेला पाहिजे. तसेच, विविध सामाजिक पार्श्वभूमीतील उमेदवारांना समान संधी मिळेल याची खात्री करणे गरजेचे आहे. यामुळे शिक्षण क्षेत्रात विविधता टिकून राहील आणि विद्यार्थ्यांना व्यापक दृष्टिकोन मिळेल.शेवटी, शिक्षण हे समाजातील विषमता कमी करण्याचे सर्वात प्रभावी साधन आहे. परंतु जर शिक्षण व्यवस्थेमध्येच विषमता निर्माण केली गेली, तर समाजातील दरी अधिक वाढेल. त्यामुळे आज गरज आहे ती समतोल, न्याय्य आणि सर्वसमावेशक शिक्षण धोरणाची. शासनाने घेतलेले निर्णय हे दीर्घकालीन परिणाम लक्षात घेऊनच घ्यावेत.११ फेब्रुवारी २०२६ चा शासन आदेश हा गुणवत्ता वाढविण्याच्या उद्देशाने घेतलेला असला, तरी त्याचे परिणाम विचारात घेतले असता तो सामाजिक विषमता वाढविणारा ठरतो. त्यामुळे या निर्णयाचा पुनर्विचार करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा "गुणवत्ता" या नावाखाली आपण नकळतपणे समाजात असमानता वाढवत आहोत, आणि हे कोणत्याही प्रगत समाजासाठी योग्य नाही.



**डॉ. राजेंद्र बगाटे, एम.ए, नेट-जेआरएफ, एम.फिल., पीएच.डी. पोस्ट-डॉक्टरेट (पीडीएफ), (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत), ईमेल - bagate.rajendra5@gmail.com**